# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## महात्मा फुले राहुरी कृषि विद्यापीठातील मध्यवर्ती परिसरातील पाईपलाईनचे कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१) १३७५२ (३०-०६-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले राहुरी कृषि विद्यापीठात राहुरी डॅम ते मध्यवर्ती परिसर कृषि प्रक्षेत्र पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनचे कामात अनियमितता झाल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पाईपलाईनचे काम हे निकृष्ट दर्जाचे होत असून या कामासाठी काढण्यात आलेल्या निविदेत अनियमितता असल्याची तसेच पाईपलाइनच्या कामासाठी काढण्यात आलेल्या गाळाची रॉयल्टी भरण्यात आलेली नसल्याच्या अनेक तक्रारी लोकप्रतिनिधी, संघटनाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यांच्या मार्फत विद्यापीठ प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अश्या तक्रारी करूनही विद्यापीठ प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय तसेच चौकशीअंती संबंधित ठेकेदार व दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (०७-१०-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) सदरच्या पाईपलाईनच्या कामाचा दर्जा योग्य असून कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणतीही अनियमितता झालेली नाही. निविदा प्रक्रिया संदर्भात तसेच गाळाच्या रॉयल्टी संदर्भात कोणतीही तक्रार कृषि विद्यापीठ प्रशासनाकडे प्राप्त झालेली नाही. तसेच सदरील कामासंदर्भातील रॉयल्टी रितसर शासनास भरण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे महापालिकेतील एका महिला अधिकाऱ्याकडून आयुक्तांच्या दौऱ्याची आगाऊ माहिती दिली असल्याचा ऑडिओ व्हायरल झाल्याबाबत

**(२) १३८२३ (२५-०८-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिकेतील एका महिला अधिकाऱ्याकडून आयुक्तांच्या दौऱ्याची आगाऊ माहिती दिली असल्याची ऑडिओ क्लीप व्हायरल झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची ठाणे महापालिकेने चौकशी करुन संबंधित महिला अधिकाऱ्याचा आवाज ओळखण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाची मदत घेण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेच्या महिनाभरानंतर महापालिकेच्या दिवा (जि.ठाणे) येथील सहायक आयुक्त महिला अधिकाऱ्याचा कार्यभार काढण्यात आला असून संबंधित महिला अधिकाऱ्याचा कार्यभार काढण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, व्हायरल ऑडिओ घटना व कार्यभार काढून घेतलेल्या महिला अधिकाऱ्याची घटना या दोन्ही घटनांच्या संबंधाबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-११-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदर महिला अधिकाऱ्याचा आवाज ओळखण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाची मदत घेण्यात आली नाही.

(३) सदर महिला अधिकाऱ्यांच्या कार्यभाराबाबतची खालीलप्रमाणे वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे :-

- सदर महिला अधिकारी दिनांक १८/०४/२०२२ ते दिनांक १८/०५/२०२२ या कालावधीत वैद्यकीय रजेवर होत्या.
- त्यांच्या रजेच्या कालावधीत त्यांचा अतिरिक्त कार्यभार अन्य सहाय्यक आयुक्तांकडे देण्यात आला होता.
- तद्नंतर त्या दिनांक २६/०५/२०२२ ते दिनांक २६/०७/२०२२ पर्यंत अर्जित रजेवर होत्या.
- तद्नंतर दिनांक २३/०५/२०२२ च्या कार्यालयीन आदेशान्वये त्यांचा अतिरिक्त कार्यभार श्री.फारूख शेख, विधी सहायक यांच्याकडे सोपविला होता.
- तद्नंतर दिनांक १३/०६/२०२२ च्या ठाणे महानगरपालिकेच्या कार्यालयीन आदेशान्वये श्रीमती खैरे यांच्याकडचा जाहिरात विभाग व जनगणना विभागाचा अतिरिक्त कार्यभार श्री.सागर सांळुखे सहाय्यक आयुक्त यांच्याकडे सोपविला आहे.
- दिनांक २६/०७/२०२२ पासून श्रीमती अलका खैरे यांच्याकडे जाहिरात विभाग व जनगणना विभागाचा सहाय्यक आयुक्त पदाचा कार्यभार आहे.

(४) तथापि, सदर प्रकरणाच्या चौकशीसाठी ठाणे महानगरपालिकेने समिती गठीत केली होती. सदर चौकशी समितीसमोर संबंधित महिला अधिकाऱ्यांनी संबंधित ऑडीओमधील आवाज त्यांचाच असल्याची कबुली दिली आहे. सदरचा चौकशी अहवाल स्विकारण्यात येऊन संबंधित अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित केली असून या प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळवा (जि.ठाणे) येथील पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३) १३८३० (२५-०८-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक १३२४३ ला दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवा (जि.ठाणे) येथील पुलाचे काम माहे डिसेंबर, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना सदर पुलाचे काम अपूर्ण असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये सदर पुलाची काम करण्याची मुदत महापालिकेने ठरवूनही अद्याप पुलाची एक मार्गिकाही सुरु करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलाच्या बांधकामाकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष व ठेकेदाराच्या हलगर्जीपणा यामुळे पुलाचे काम रखडले असून त्यामुळे दररोज हजारो नागरिकांना त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाचे बांधकाम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदार व प्रशासनातील दोषी अधिकारी यांचेवर कारवाई करुन पुलाचे काम पूर्ण करुन पुल वाहतुकीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-१०-२०२२) :** (१), (२) व (३) कळवा खाडीवर (जि.ठाणे) अस्तित्वात असलेल्या ब्रिटीशकालीन पुलावरील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्याकरीता त्या ठिकाणी एक नवीन पूल बांधण्याचे काम ठाणे महानगरपालिकेने हाती घेतले आहे.

सदर प्रकल्प कार्यान्वित करताना विविध विभागांकडून घ्याव्या लागणाऱ्या परवानग्या तसेच प्रत्यक्ष काम करतेवेळी उद्भवणाऱ्या अडचणीमुळे काम विहित मुदतीत पूर्ण होऊ शकले नाही, ही वस्तूस्थिती आहे. तथापि, सद्य:स्थितीत कळवा पूलाचे ९३% काम पूर्ण झाल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर कामाचे देयक कामाच्या प्रगती नुसार यथाप्रमाणे टक्केवारीवर आधारीत देण्यात येणार असून आत्तापर्यंत रुपये १६३.३८ कोटी इतके देयक टप्प्या-टप्प्यामध्ये ठेकेदारास अदा करण्यात आले आहे.
(४) ठाणे महानगरपालिकेने खालील नमूद कारणांमुळे कळवा खाडी पूलाचे काम विहित मुदतीत पूर्ण झाले नसल्याची बाब कळविली आहे :-

- मा.उच्च न्यायालयाकडून पूलाचे बांधकाम करण्यासाठी आवश्यक असलेली कांदळवन काढण्याबाबतची परवानगी दिनांक २५/०६/२०१८ रोजी प्राप्त झाली.
- उत्तमराव पाटील उद्यानाच्या भागामध्ये पुलासाठी आवश्यक असणाऱ्या बांधकामाची परवानगी दिनांक २६/०६/२०१९ रोजी प्राप्त झाली. निविदा आराखड्यास महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाची परवानगी घेतली होती. तथापि, जलमार्ग एन-५३ च्या प्रस्तावातील बाबींमुळे खाडी पूलाच्या पिअरच्या जागांमध्ये होणाऱ्या बदलास नव्याने महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाची परवानगी दिनांक १४/०४/२०१८ रोजी घेण्यात आली.
- सदर पूलाचे बांधकाम करताना वाहतूक नियोजनाच्या दृष्टीने वाहतूक पोलीस विभागामार्फत टप्प्या-टप्प्याने काम करणेबाबत परवानगी प्राप्त झाली.
- दरम्यान माहे मार्च, २०२० पासून कोविड-१९ साथीमध्ये लागू केलेले कडक निर्बंध तसेच कुशल मजूरांची कमतरता याचा थेट परिणाम कामाच्या प्रगतीवर झाला आहे.

उपरोक्त नमूद बाबींमूळे प्रकल्प पूर्ण करण्यास विलंब झाल्याने या कामाकरीता वेळोवेळी मुदतवाढ घेण्यात आली आहे. तसेच सदर पुलाची एक मार्गिका पूर्णपणे वाहतुकीसाठी तयार आहे. तसेच पुलाचा साधारणत: ८० % भाग वाहतुकीसाठी उपलब्ध होणार आहे. तसेच उर्वरित कामे माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेतील सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्तीनंतरची देणी अदा करण्याबाबत

**(४) १३९३५ (२५-०८-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एन पश्चिम कार्यालयाच्या सफाई विभागातून माहे जानेवारी, २०१६ मध्ये सेवानिवृत्त झालेले कामगार रमेश खंडागळे यांना मागील ६ वर्षापासून सेवानिवृत्तीनंतरची मिळणारी आर्थिक देणी व निवृत्तीवेतन मिळाले नसल्यामुळे त्यांचेवर उपासमारीची वेळी आली असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्तीनंतरची देणी व निवृत्ती वेतन मिळण्याकरीता श्री.खंडागळे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयात येवून पाठपुरावा करुनही त्यांची देणी मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सेवानिवृत्त सफाई कर्मचारी रमेश खंडागळे यांचे सेवानिवृत्तीनंतरची देणी त्यांना अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-११-२०२२) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच/पश्चिम विभागातील घन कचरा व्यवस्थापन खात्यातील श्री.रमेश रामचंद्र खंडागळे हे दिनांक ०१/०२/२०१६ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

श्री.खंडागळे यांना माहे मे, २०२२ मध्ये भविष्य निर्वाह निधीचा दावा मंजूर झाला असून, सदर दाव्यापोटी रुपये २,४८,३९० इतक्या रकमेचे त्यांना अधिदान करण्यात आले आहे. तसेच, निवृत्ती वेतन व ग्रॅज्युटीचे दावे मंजूर होऊन माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये रुपये १८,२९,८७० इतक्या रकमेचे अधिदान झाले आहे.

अशाप्रकारे श्री.खंडागळे यांचे देय दावे निकाली काढण्यात येऊन त्यांचे अधिदान पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोगस डॉक्टरांवर निर्बंध आणण्यासाठी क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट लागू करण्याबाबत

**(५) १३९४८ (२८-०६-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबईसारख्या शहरात वैद्यकीय अभ्यासक्रमाची कोणतीही पदवी नसलेले डॉक्टर सर्रासपणे औषधे देत असल्याचे आढळून येत असून रुग्णांना लहान जागेत सलाईन लावून भरती करून त्यांच्याकडून हजारो रुपये घेत असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिसनर्स अक्ट, १९६१ नुसार एमबीबीएस व एमडी डॉक्टरांनी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडे तसेच बीएमएस आणि डीओएमएस यांनी महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन कौन्सिलकडे, बीएचएमएस व डीएचएमएस पदवीधारकांनी महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिलकडे, बी.डी.एस. व एम.डी.एस.पदवीधारकांनी महाराष्ट्र डेंटल कौन्सिलकडे नोंदणी केली असून पदवी प्राप्त डॉक्टरांना ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात व्यवसाय करता येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोगस डॉक्टरांवर निर्बंध आणण्यासाठी क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट लागू करण्याची मागणी अनेक तज्ञ डॉक्टरांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील गरीब व गरजु रुग्णांची होणारी लुट रोखण्यासाठी तसेच मुंबईकरांच्या जीवाशी होणारा खेळ थांबविण्यासाठी सदरील नवीन ॲक्ट लागू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१७-१०-२०२२) :** (१) सन २०२२ मध्ये माहे जुलै अखेर मुंबईमध्ये बोगस डॉक्टरांद्वारे औषधोपचार केल्या संदर्भात ९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(२) होय.
(३) व (४) केंद्र शासनाचा चिकित्सालयीन आस्थापना अधिनियम, २०१० च्या धर्तीवर राज्याचा स्वतंत्र चिकित्सालयीन आस्थापना अधिनियम, तयार करण्यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाद्वारे कार्यवाही सुरू आहे. दरम्यान बोगस वैद्यकीय व्यवसायीकांविरुध्द भारतीय दंड विधान संहिता, १८६० तसेच महाराष्ट्र वैद्यक व्यावसायिक अधिनियम, १९६१ अंतर्गत संबंधित पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वर्धा जिल्हा परिषदेच्या विशेष घटक योजनेंतर्गत दुग्ध व्यवसायाला चालना देण्यासाठी गायी खरेदी प्रकरणात शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याबाबत

**(६) १४०८६ (३०-०६-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हा परिषद विशेष घटक योजनेंतर्गत अनु.जाती/जमाती लाभार्थ्यांसाठी जिल्हा परिषद सेस फंडातून व पशुसंवर्धन कार्यालयाच्या नाविण्यपूर्ण योजना मधून दुग्ध व्यवसायाला चालना देण्यासाठी गायी खरेदी प्रकरणात शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे दिनांक २ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यां दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) :** (१) शेतकऱ्यांची फसवणूक झाली हे खरे नसून लाभार्थी निवडीबाबत तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) प्राप्त तक्रारी संदर्भात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांनी चौकशी केलेली असून, सदर तक्रारीत तथ्य आढळून आलेले नाही.

तक्रारदार लाभार्थीनेच सदर योजनेच्या अटी व शर्तींचे आणि बंधपत्रात नमूद तरतुदींचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट होत असल्यामुळे त्यांची सदर योजनेंतर्गत खरेदी प्रक्रिया, दुभते जनावरे वाटपाचा लाभ रद्द करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लोहा (जि.नांदेड) नगरपालिकेने भीमजयंती मिरवणूक मार्गावरील देखभाल, दुरुस्ती व स्वच्छतेची व्यवस्था केली नसल्याबाबत

**(७) १४१०१ (२५-०८-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) नगरपालिका प्रशासनाने शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मिरवणूक मार्गावर रस्त्यांची सफाई व स्वच्छता करणे आवश्यक असतानाही सदरहू कामे करण्यात आली नसल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मिरवणूक काळात सावलीसाठी आच्छादन करण्यात आले नाही, याशिवाय मिनरल पाण्याची व्यवस्थासुध्दा केली नसल्यामुळे आंबेडकरी जनतेनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या नगरपालिका प्रशासनातील दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-११-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

लोहा शहरात दरवर्षी प्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक मार्गावर नगरपरिषदेमार्फत रस्ते व नाल्यांची साफसफाई करुन, जंतूनाशक पावडर फवारणी करण्यात आली होती.

तसेच नगरपरिषदेने मिरवणूक मार्गावर स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची व्यवस्था करुन, जयंती मंडळाकडून विविध ठिकाणी बसण्याची व इतर सोयींसाठी मंडपव्यवस्था करण्यात आली होती. यासंदर्भात नगरपरिषदेस कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अहवाल सादर केला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील गुंठेवारीला ६ महिन्यांची मुदतवाढ देण्याबाबत

**(८) १४११० (२५-०८-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गुंठेवारी करण्याची मुदत दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी संपली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे अनेक लाभार्थी गुंठेवारीपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने येथील लाभार्थींना गुंठेवारी करण्यासाठी ६ महिन्यांची मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) नांदेड जिल्ह्यात गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी १५/०२/२०२२ पासून सुरु करण्यात येवून दिनांक ३०/०६/२०२२ पर्यंत प्रस्ताव स्वीकारण्यात आले असून सदर प्रस्ताव स्वीकारण्याची मुदत दिनांक ३१/१०/२०२२ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

---

## एकात्मिक बालविकास कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या अंगणवाडी सेविका/ मदतनीस यांना सेवानिवृत्ती नंतरचे लाभ मिळण्याबाबत

**(९) १४१२५ (२५-०८-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील एकात्मिक बालविकास कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या अंगणवाडी सेविका/ मदतनीस हे सेवानिवृत्त होवून २ वर्षे पूर्ण होवूनही त्यांना अद्याप निवृतीनंतर मिळणारी रक्कम मिळाली नसल्याचे दिनांक १६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदर सेवानिवृत्त अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना निवृत्तीनंतर मिळणारी रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१४-१०-२०२२) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे,

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती / मुत्यू / राजीनामा/ सेवेतून काढून टाकणे या प्रकरणी LIC मार्फत एकरकमी लाभ देण्याची योजना आहे. त्यानुसार गडचिरोली जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे एकरकमी लाभाचे एकूण ७२५ प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यापैकी २३३ प्रकरणी अंगणवाडी सेविका / मदतनीस यांना लाभ मिळालेला असून उर्वरीत प्रस्तावांना एकरकमी योजनेचा लाभ मंजूर करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर योजनेतंर्गत राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या एकरकमी लाभाचे प्रस्ताव निकाली काढण्याकरीता एल.आय.सी.ला रुपये १०० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळात रिक्त असलेल्या पदावर पदोन्नती करण्याबाबत

**(१०) १४१३३ (२५-०८-२०२२) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कामाची व्याप्ती, कार्यकक्षा व जबाबदारी वाढत असून प्रशासकीय अधिकारी पदावर असलेल्या अधिकाऱ्यांना अतिरिक्त पदभार देऊन मंडळाचा प्रशासकीय कारभार करण्यात येतो तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील सहाय्यक विधी अधिकारी ही पदे बऱ्याच वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कनिष्ठ लिपिक संवर्गातील पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना सेवेत रुजु झाल्यापासून पदोन्नतीच्या संधी उपलब्ध झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत तसेच रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील प्रशासकीय अधिकारी पदावर तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती देण्यात आली आहे.

तसेच सहाय्यक विधी अधिकारी संवर्गात पदोन्नती कोटयातील २ पदांपैकी १ रिक्त पद सन २०१८-१९ मध्ये भरण्यात आले असून निम्न संवर्गात कर्मचारी उपलब्ध नसल्याने दुसरे पद दिनांक ३१/१२/२०१८ पासून रिक्त आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सेवाप्रवेश नियम व पदोन्नतीसंबंधी शासनाचे नियम/ शासन निर्णय यानुसार पदोन्नतीची रिक्त पदे नियमितपणे भरण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कायम पाणीटंचाई असलेल्या गावे/ वाड्यांकरीता पाणीपुरवठा योजना आखण्याबाबत

**(११) १४१४१ (२५-०८-२०२२) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ६०५६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागातील अनेक गाववाड्यांना उन्हाळयाच्या दिवसात पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे दिनांक १२ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सध्या राज्यातील १०१९ गावांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात दरवर्षी उन्हाळयात पाणीटंचाई असलेल्या गांवे/वाड्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी पाणीटंचाईचा आराखडा तयार करुन पाणीटंचाई दूर करण्यासाठी दरवर्षी कोटयवधी रुपये खर्च केले जातात, परंतु सदरहू सर्व निधी वाया जात असून दरवर्षी ग्रामीण भागात टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो, हे खरे आहे काय,
(३) तसेच, राज्यातील अनेक दुर्गम आदिवासी पाड्यातील ग्रामस्थांना हंडाभर पाण्यासाठी दऱ्याखोऱ्यातून मैलोनमैल वणवण फिरावे लागत असून दरवर्षी सदरहू आदिवासीपाड्यांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सर्वच विभागांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत पाणीसाठा कमी झाला असून राज्यातील धरणांमध्ये ४४ टक्केच पाणीसाठी असल्याचे दिनांक ३ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील गावे/ वाड्या तसेच सर्वच आदिवासी पाडे पाणीटंचाईमुक्त करण्यासाठी पाणीटंचाईचा आढावा घेऊन पाणीटंचाईग्रस्त गावातील नागरिकांना कायमस्वरुपी पाणीपुरवठा करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (३०-०९-२०२२) :** (१) राज्यातील १०१७ गावे व ९६१ वाड्या असे एकूण १९७८ गाव वाड्यांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाली होती, हे खरे आहे.
(२) राज्यामध्ये वेगवेगळया जिल्ह्यात पर्जन्यमान कमी-जास्त होत असल्यामुळे राज्यातील काही तालुक्यात/भागात पाणी टंचाई निर्माण होते. त्याकरीता शासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येतात. त्यामधील शेवटचा उपाय म्हणून टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो.
(३) राज्यात अतिदुर्गम, डोंगराळ, खडकाळ भागात पिण्याच्या पाण्याचा शाश्वत स्त्रोत उपलब्ध नाही, अशा ठिकाणी नागरिकांना काही कालावधीसाठी पाणी टंचाईला सामोरे जावे लागते, हे खरे आहे.
(४) जिल्ह्यांतील विविध धरणांमधील धारण क्षमतेच्या प्रमाणात पाणीसाठा वेगवेगळा आढळून आला आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(५) "जल जीवन मिशन" या केंद्र पुरस्कृत योजनेमधील मंजूर आराखड्यातील सर्व गावे व वाड्यांतील प्रती कुंटुंबातील व्यक्तीना ५५ लिटर प्रती दिन, प्रती माणसी १०० टक्के घरांना नळ जोडण्या देणेबाबत मार्च २०२४ अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात 'महाबीज' च्या सोयाबीन बियाण्याची भरमसाठ दरवाढ झाल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला असल्याबाबत

**(१२) १४१६४ (३०-०६-२०२२) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महाबीज प्रशासनाने आगामी खरीप हंगामासाठी सोयाबीनचे वाढीव दर नुकतेच जाहीर केले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाबीज प्रशासनाने गेल्या वर्षी महाबीज सोयाबीन ३० किलोची साधारणपणे २२५० रुपयांना मिळणाऱ्या बॅगच्या किंमतीत वाढ करुन सदर बॅगची किंमत ३९०० ते ४२५० रुपये इतकी करण्यात आल्यामुळे प्रति ३० किलोच्या बॅगेसाठी शेतकऱ्यांना २००० रुपये अधिकचे द्यावे लागणार असल्याचे दिनांक २५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र व राज्य शासनाने नुकतेच पेट्रोल-डिझेलचे (सन २०२२) दर कमी केले असताना सोयाबीनच्या प्रति ३० किलोच्या बॅगेसाठीचे दर इतक्या मोठ्या प्रमाणात वाढविण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेंच शेतकऱ्यांची सर्वाधिक पसंती सोयाबीनला असल्यामुळे शासनाने वाढविलेले दर कमी करण्याबाबत राज्यातील शेतकरी तसेच मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे तशी मागणी केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सोयाबिन बियाण्याची वाढविलेले दर कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अब्दुल सत्तार (१४-१०-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) खरीप हंगाम २०२१ मध्ये राज्यातील कोविड परिस्थितीमुळे सोयाबीन बियाणांची दरवाढ न करता खरीप हंगाम २०२० मधील दर कायम ठेवण्यात आलेले होते. सोयाबीन बियाणांच्या दरवाढी मागे बिजोत्पादक शेतकऱ्यांना दिलेला खरेदी दर, सोयाबीन बियाणांची प्रक्रिया व पॅकिंग करीता लागणारा खर्च, बियाणांचा वाहतूक खर्च, बीज प्रमाणीकरण यंत्रणेस द्यावयाचे शुल्क इ. बाबी कारणीभूत आहेत. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला हे ना नफा ना तोटा या तत्वावर राज्यात काम करीत आहे. खरीप हंगाम २०२२ मध्ये इतर खाजगी बियाणे कंपन्यांच्या तुलनेत महाबीज बियाणांचे दर हे कमी आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील औषध उत्पादक औषधांची निर्मिती करताना औषध आणि सौदर्य प्रसाधन कायद्याचे उल्लंघन करित असल्याबाबत

**(१३) १४२४३ (२५-०८-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औषध उत्पादक औषधांची निर्मिती करताना औषध आणि सौंदर्य प्रसाधन कायद्याचे उल्लंघन करीत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने माहे जानेवारी ते मार्च दरम्यान केलेल्या ६५५ उत्पादकांच्या तपासणीतून सदर बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कायद्याचे उल्लघंन करणाऱ्या उत्पादकांवर "कारणे दाखवा" नोटिस बजावण्यात आली आहे काय, तसेच दोषी उत्पादकांनी नोटीसाचा खुलासा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (३१-१०-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
अन्न व औषध प्रशासनाकडून औषध उत्पादकांच्या परवाना अटीचे अनुपालन पडताळणीसाठी नियमीत तपासण्या करताना काही उत्पादकांचे गंभीर स्वरूपाचे उल्लंघन आढळून आले आहे.
(२) माहे जानेवारी, २०२२ ते मार्च, २०२२ या कालावधीत एकूण ६१३ ॲलोपॅथिक औषध उत्पादकांच्या तपासण्या करण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे आहे.
(४) माहे जानेवारी, २०२२ ते मार्च, २०२२ या कालावधीत एकूण ६१३ ॲलोपॅथिक औषध उत्पादकांच्या तपासण्या करण्यात आल्या आहेत. त्यापैकी १०१ ॲलोपॅथिक उत्पादकांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली असून त्यापैकी ५७ उत्पादकांचे परवाने निलंबित करण्यात आले व १५ ॲलोपॅथिक उत्पादकांचे परवाने रद्द करण्यात आले, उर्वरित २९ कारणे दाखवा नोटीसवर निर्णय प्रलंबित आहे.
(५) लागू नाही.

---

## नागपूर येथील शासकीय दुध योजना सुरु करण्याबाबत

**(१४) १४३८८ (०३-०७-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील शासकीय दुध योजना गेल्या दोन वर्षापासून बंद स्थितीत असल्याचे दिनांक १ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना बंद करुन मदर डेअरीला सोपविण्यात आली आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, यांसदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर येथील शासकीय दूध योजना पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१४-१०-२०२२) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) विदर्भ व मराठवाडा या विभागात दूध उत्पादन वाढीसाठी तसेच या भागातील उत्पादित दूध संकलित करून त्यावर प्रक्रिया करण्याकरीता न्यू जनरेशन कॉ-ऑपरेटीवचा अवलंब करण्याकरीता राष्ट्रीय दुग्धविकास मंडळा समवेत दिनांक १६/१२/२०१३ रोजी शासनस्तरावर सामंजस्य करार करण्यात आला. शासन निर्णय एमएलके-२०१२/प्र.क्र.११४/ पदुम-८, दिनांक १४/०२/२०१४ अन्वये शासकीय दूध योजना, नागपूर ही राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ संचालित मदर डेअरी फ्रुट्स ॲण्ड व्हेजिटेबल प्रा.लि.कंपनीस नाममात्र दराने ३० वर्षाच्या कालावधीसाठी व त्या पुढील तितक्याच वर्षाच्या नुतनीकरण करारावर हस्तांतरीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथील कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेली निवासस्थाने रिक्त असल्याबाबत

**(१५) १४३९४ (२५-०८-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथील कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेली ४२ टक्के निवासस्थाने रिक्त असल्याचे माहे एप्रिल-२०२२ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवास स्थानामध्ये बेकायदेशीर अपात्र व्यक्ती राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (११-१०-२०२२) :** (१) होय.

विद्यापीठाच्या विविध परिसरात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी एकूण ९२ निवासस्थाने असून यापैकी सद्य:स्थितीत एकूण ३९ निवासस्थाने रिक्त आहेत.

(२) व (३) विद्यापीठातील निवासस्थानामध्ये राहण्यास अपात्र असलेल्या व नियमानुसार सेवानिवृत्त झालेल्या तीन कर्मचाऱ्यांनी अद्यापी निवासस्थान रिक्त केले नाही.

विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या तीन कर्मचाऱ्यांपैकी एक कर्मचाऱ्याकडून निवासस्थान कायदेशिररित्या रिक्त करवून घेण्यासाठी प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच उर्वरित दोन कर्मचाऱ्यांकडून निवासस्थान कायदेशिररित्या रिक्त करुन घेण्यासाठी न्यायालयीन / कायदेशिर प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मेसर्स सुयोग टेलिमेट्रीक्स लि. या कंपनीला भाडेतत्वावर देण्यात आलेल्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) १४४०५ (२५-०८-२०२२) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मेसर्स सुयोग टेलिमेट्रीक्स लि.या कंपनीला भाडेतत्वावर टेलिकॉम बीटीएस अँटेना उभे करण्यासाठी मुंबई व उपनगरातील सर्व उड्डाणपूल मागील दहा वर्षापासून दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू काम कोणत्या वर्षापासून मे.सुयोग या कंपनीला भाडेतत्वावर देण्यात आले होते, तद्नंतर निविदा न काढता किती वेळेस सदर कंपनीला मुदतवाढ वाढवून देण्यात आली आहे,

(३) असल्यास, निविदेनुसार व ठरावाप्रमाणे किती भाडे येणे अपेक्षित होते, सुरुवातीपासून आतापर्यंत किती रक्कम येणे अपेक्षित होते व प्रत्यक्षात किती रक्कम जमा झाली आहे,

(४) असल्यास, संबंधित खात्याकडे किती अनामत जमा आहे, यासर्व व्यवहारामध्ये अनियमितता होऊन गैरव्यवहार झाल्याची शक्यता असल्याने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-११-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मेसर्स सुयोग टेलिमॅट्रिक्स लि.या कंपनीला बी. टी. एस. अँटेना उभे करण्यासाठी मुंबई महानगरप्रदेशातील महामंडळाच्या अखत्यारीतील उड्डाणपूलावरील तसेच वांद्रे – वरळी सागरी सेतू वरील खांब सन २००८ व २००९ पासून बी.टी.एस. उपकरणे लावण्यासाठी भाडेतत्वावर दिले होते.

(२) सदरहू काम दोन स्वतंत्र कंत्राटाव्दारे दिनांक ३०/०४/२००८ (मुंबई उड्डाणपूल) व दिनांक ०१/०९/२००९ (वांद्रे-वरळी सागरी सेतू) पासून मेसर्स सुयोग टेलिमॅटिक्स लि.ला देण्यात आले होते. दोन्ही कंत्राटांना निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. पहिले कंत्राट संपुष्टात आल्यानंतर निविदा प्रकियेव्दारे दोन्ही कंत्राटे अनुक्रमे दिनांक २०/१२/२०१६ व दिनांक ०१/०१/२०१७ पासून मेसर्स सुयोग टेलिमॅटिक्स लि.ला देण्यात आले होते. परंतु सदर कंपनीने वेळोवेळी विहित भाडे न भरल्याने व मागील थकबाकी असल्याने सदर कंत्राट संपुष्टात आणण्यात आले आहे. सबब, संबंधित कंपनीस कोणतीही मुदतवाढ देण्यात आली नाही.
(३) सदर करारानुसार महामंडळास एकूण कालावधीमध्ये रुपये ६३,२८,५९,४५२/- इतके भाडे येणे अपेक्षित होते. मेसर्स सुयोग टेलिमॅटिक्स लि.यांनी एकूण रुपये ५०,४५,८२,४९५/- इतके भाडे महामंडळास अदा केले आहे. विलंबामुळे व्याजासह अद्याप रुपये ३६,९८,९४,४३४/- इतकी रक्कम दिनांक ०७ जुलै, २०२२ पर्यंत थकीत आहे.
(४) थकबाकी भरण्याच्या अनुषंगाने नोटिस दिल्यानंतर मेसर्स सुयोग टेलिमॅटिक्स लि.यांनी पूर्ण रक्कम न भरल्याने त्यांच्या सर्व उपकरणांवर डिस्कनेक्शनची कारवाई करण्यात आली व व्याजासह थकबाकी वसुलीसाठी मेसर्स सुयोग टेलिमॅटिक्स लि.यांच्या विरोधात महाराष्ट्र राज्य रस्ते विकस महामंडळाकडून कायदेशीर कारवाई (Recovery Suit) दाखल करण्यात येत आहे. तसेच मेसर्स सुयोग टेलिमॅटिक्स लि.यांच्या विरोधात पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अकोला जिल्ह्यांसह कृषि केंद्रावर बोगस व बनावट रासायनिक खते व बियाणे दुप्पट दराने विकत असल्याबाबत

**(१७) १४४६६ (३०-०६-२०२२) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतकऱ्यांकडून खरीप हंगामातील पेरणी पूर्व पीक मशागतीची कामे करण्यात येत असून बियाणे खरेदीसोबतच रासायनिक खतांची मोठ्या प्रमाणात मागणी शेतकऱ्यांकडून केली जात असताना, कृषि केंद्रावर शेतकऱ्यांना बोगस बियाणे व खते घेण्याची जबरदस्ती करण्यात येऊन शासकीय भावापेक्षा दुप्पट-तिप्पट भावाने बियाणे व महाबीज खतांसह रासायनिक खते शेतकऱ्यांना खरेदी करावी लागत असल्याच्या तक्रारी अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत असल्याचे दिनांक २९ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबत कृषि विभागाकडून नियंत्रण ठेवण्याची गरज असताना देखील कृषि विभागाकडून कार्यवाही करण्यात आली नाही हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१४-१०-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद येथील मे.पंचगंगा सीड्स कंपनीमध्ये बोगस बियाणांचा साठा आढळून आल्याबाबत

**(१८) १४४८७ (३०-०६-२०२२) श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक १३५३२ ला दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद (जि.औरंगाबाद) येथील मे.पंचगंगा सीड्स कंपनी प्रा.लि. येथे बियाणे अधिनियम, नियम व नियंत्रण आदेशांतर्गत कृषी विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ रोजी केलेल्या तपासणीमध्ये भेंडी व वांगी या पिकाचे बोगस बियाणे व ७५ टनाचा अवैध साठा आढळून आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तपासणी दरम्यान मे.पंचगंगा सिड्स कंपनी प्रा.लि.औरंगाबाद यांनी बियाणे विक्री परवाना नुतनीकरण केलेले नसणे व परवाना दर्शनी भागावर लावलेला नसणे, पुरवठा साठा फलक, भाव फलक व साठा रजिस्टर उपलब्ध नसणे, बियाणे विक्री रजिस्टर व शिल्लक साठा जुळत नसणे, मुदत बाह्य बियाणांचा साठा नोंदवहीत शेरा मारून ठेवलेला नसणे इ. त्रुटींमुळे सदर कंपनीचा परवाना रद्द करण्याची शिफारस केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कृषी विभागाने बोगस बियाणे उत्पादन करणाऱ्या कंपनीवर कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी प्रधान सचिव (कृषी) यांच्या स्तरावर चौकशी करण्यात येऊन एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याबाबतचे आदेश देण्यात आलेले आहेत हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोगस बियाणे शेतकऱ्यांना विकणाऱ्या मे.पंचगंगा सिड्स कंपनी प्रा.लि., औरंगाबाद या कंपनीचा बियाणे परवाना रदद् करुन अहवाल सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१४-१०-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) बियाणे निरीक्षक, औरंगाबाद यांनी मे.पंचगंगा सीड्स प्रा. लि. या बियाणे कंपनीचा प्रस्ताव योग्य त्या कार्यवाहीसाठी परवाना प्राधिकारी तथा कृषि संचालक (नि.व गु.नि.), कृषि आयुक्तालय, पुणे यांना पाठविलेला होता.

(३) मे.पंचगंगा सीड्स प्रा. लि., औरंगाबाद यांनी भेंडी पिकाच्या वाणाच्या नावात बदल करुन विक्री केलेली असल्याचे निदर्शनास आल्याने बियाणे कायद्यातील तरतुदीनुसार बियाणे कंपनीचा परवाना पुढील आदेश होईपर्यंत निलंबित करण्यात आला होता.तसेच बियाणे परवान्यातील वाणाची विक्री करु नये अथवा

इतरत्र हलवू नये वा त्याची विलेवाट लावू नये असे आदेश देण्यात आलेले होते. सदर आदेशाविरुध्द मे.पंचगंगा सीड्स प्रा.लि. या बियाणे कंपनीने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केली होती. या संदर्भात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी बियाणे कंपनीचा परवाना निलंबित करण्याबाबतचे आदेश रद्द केले असून प्रकरणी सुनावणी घेऊन सुनावणीअंती योग्य तो निर्णय घेण्याचे आदेशित केले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) मा.उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी सुनावणी घेऊन कायद्यातील तरतुदीनुसार योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार परवाना प्राधिकारी तथा कृषि संचालक (नि.व गु.नि.) यांच्या स्तरावर सुनावणीबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात बनावट मद्य तपासण्याची यंत्रणा सुरू करण्याबाबत

**(१९) १४६०१ (२५-०८-२०२२) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे मद्य बनावट आहे की नाही हे तपासण्याची यंत्रणा नसल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मद्य बनावट असल्याचे लक्षात येऊनही त्याबाबत कुठेही तक्रार करण्याची सोय उपलब्ध नसल्या कारणाने राज्यात सर्रास बनावट मद्य विक्री होत असून राज्याचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे बनावट मद्य तपासण्याची यंत्रणा तसेच तक्रार निवारण यंत्रणा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई (१४-१०-२०२२) :** (१) बनावट मद्य ओळखण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरण्यात येते.

(अ) किरकोळ मद्यविक्रीच्या अनुज्ञप्तीमधील मद्य हे परिवहन पासव्दारे घाऊक विक्रेत्याकडून आले किंवा नाही याची खात्री केली जाते, मद्यसाठ्याची पडताळणी नोंदवहीशी केली जाते. त्यावरुन ते बनावट आहे किंवा कसे? याबाबत प्रथमदर्शनी मत तयार केले जाते.

(आ) जप्त मद्याची पडताळणी हाफकीन इन्स्टीट्यूट, परेल, मुंबई व मे. वसंतदादा शुगर इन्स्टीट्यूट, पुणे इ. यंत्रणाकडून केली जाते.

(इ) बनावट मद्याच्या अनुषंगाने नोंदविलेल्या गुन्ह्यातील जप्त मद्याचे नमुने तपासणीसाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठविले जातात.

(ई) मद्य ज्या निर्माणीचे आहे त्याचेकडून सुध्दा लेबल, बूच, मद्याची तीव्रता, रंग इ. बाबत खात्री केली जाते.

(२) व (३) राज्य उत्पादन शुल्क विभागाने आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापित केलेला आहे. नागरिकांना तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्र. १८०० २३३ ९९९९ व व्हॉटसअ‍ॅप क्र. ८४२२००११३३ प्रसिध्द केला आहे.

राज्यात सन २०२०-२१ मध्ये रुपये १५०८९.३७ कोटी व सन २०२१-२२ मध्ये रुपये १७२२८.८३ कोटी इतका महसूल जमा झालेला आहे. यावरुन महसुलात वाढ झाल्याचे दिसून येते.

मद्यातील भेसळ व तीव्रता ओळखण्यासाठी इलेक्ट्रॉनिक संयंत्रे खरेदी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासन अनुदानित आयुर्वेदिक महाविद्यालयातील अध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२०) १४६१६ (२५-०८-२०२२) श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन अनुदानित आयुर्वेदिक महाविद्यालयामध्ये सुमारे २७० पेक्षा अधिक अध्यापकांची विविध पदे ६ वर्षापेक्षा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (३०-०९-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांमधील अध्यापकांची सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरीता निवड मंडळाची स्थापना केली आहे. तथापि, मा.न्यायालयाचे अंतरिम स्थगिती आदेश असल्याने पदभरती झाली नाही. आता सदर न्यायालयीन याचिकेचा दिनांक २३/०३/२०२२ रोजी निकाल शासनाच्या बाजूने लागला असला तरी, मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे संबंधित संस्थांनी विशेष अनुमती याचिका दाखल केली असल्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मात्र, पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे नियमितरित्या पूर्वीप्रमाणेच भरण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.